भाग "अ"

| कर्जत येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत न्यायालय क्र.१ यांचे न्यायालयात<br>(पिठासिन अधिकारी एस.एन. थापेकर) | |
|---|---|
| MHAH220015922022 | दाखल दिनांक – १२.१०.२०२२<br>नोंदणी दिनांक – १३.१०.२०२२<br>न्यायनिर्णय दिनांक – १३.०८.२०२६<br>कालावधी – वर्षे महिने दिवस<br>०३ १० ०१<br>नियमित फौ. खटला क्र.२५६/२०२२<br>निशाणी – ५४ |
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र सरकार तर्फे पो. स्टे. कर्जत. |
| सरकारी अभियोक्ता | श्री. डी. आर. बाविस्कर |
| आरोपी | १. **दिपक मधुकर रेपाळे,**<br>वय–२८ वर्षे, व्यवसाय– –,<br>२. **लताबाई मधुकर रेपाळे,**<br>वय–५७ वर्षे, व्यवसाय– –,<br>३. **मधुकर निवृत्ती रेपाळे,**<br>वय–६७ वर्षे, व्यवसाय– –,<br>४. **सिमा बापु ढेंबरे,**<br>वय–३७ वर्षे, व्यवसाय– –,<br>आरोपी क्र.१ ते ४ रा. पारगाव सुद्रिक,ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर.<br>५. **अश्विनी नितीन भापकर,**<br>वय–३२ वर्षे, व्यवसाय– –,<br>आरोपी क्र.५ रा. यवत, ता.दौंड, जि.पुणे.<br>६. **कोमल निलेश बडे,**<br>वय–३० वर्षे, व्यवसाय– घरकाम,<br>आरोपी क्र.६ रा. सादलगाव, ता.शिरुर, जि.पुणे. |

| | |
|---|---|
| | ७. **सविता नवनाथ खामकर,**<br>वय–२७ वर्षे, व्यवसाय– –,<br>आरोपी क्र.७ रा. घारगाव,<br>ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर. |
| **आरोपींचे विधीज्ञ** | श्री. के. एस. शेवाळे |

**भाग "ब"**

| | |
|---|---|
| **घटनेचा दिनांक** | दि.२२/०४/२०२१ च्या दोन महिन्यानंतर ते दि.२९/०७/२०२२ रोजी पर्यंत |
| **प्रथम खबरी अहवालाचा दिनांक** | २३.०८.२०२२ |
| **दोषारोपपत्राचा दिनांक** | १२.१०.२०२२ |
| **दोषारोप ठेवल्याचा दिनांक** | ०४.०८.२०२६ |
| **पुरावा सुरु केल्याचा दिनांक** | ०७.०८.२०२६ |
| **न्यायनिर्णयाचा दिनांक** | १३.०८.२०२६ |

**<u>आरोपीचा तपशिल</u>**

| **आरोपींची नावे** | **आरोपींस अटक केल्याचा दिनांक** | **आरोपींस जामीनावर सोडल्याचा दिनांक** | **कलम** | **दोषपुर्ण की दोषमुक्त** | **शिक्षा लादली** |
|---|---|---|---|---|---|
| **१. दिपक मधुकर रेपाळे** | २२/०९/२०२२ | २२/०९/२०२२ | भारतीय दंड विधान कलम ४९८–अ, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ | दोषमुक्त | निरंक |
| **२. लताबाई मधुकर रेपाळे** | २२/०९/२०२२ | २२/०९/२०२२ | | दोषमुक्त | निरंक |
| **३. मधुकर निवृत्ती रेपाळे** | २२/०९/२०२२ | २२/०९/२०२२ | | दोषमुक्त | निरंक |
| **४. सिमा बापु ढेंबरे** | २२/०९ | २२/०९/ | | दोषमुक्त | निरंक |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | /२०२२ | २०२२ | | | |
| **५. अश्विनी नितीन भापकर** | २२/०९ /२०२२ | २२/०९/ २०२२ | | दोषमुक्त | निरंक |
| **६. कोमल निलेश बडे** | २२/०९ /२०२२ | २२/०९/ २०२२ | | दोषमुक्त | निरंक |
| **७. सविता नवनाथ खामकर** | २२/०९ /२०२२ | २२/०९/ २०२२ | | दोषमुक्त | निरंक |

**भाग "क"**

अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन साक्षीदार यांची यादी.

**अ. अभियोग पक्ष :-**

| **पद** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी, पोलीस, तज्ञ, वैद्यकीय, पंच किंवा इतर)** |
|---|---|---|
| सा.क्र.१ | सुदामती दिपक रेपाळे | फिर्यादी |

**ब. बचाव पक्ष :-**

| **पद** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी, पोलीस, तज्ञ, वैद्यकीय, पंच किंवा इतर)** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन साक्षीदार :-**

| **पद** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी, पोलीस, तज्ञ, वैद्यकीय, पंच किंवा इतर)** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन निशाणी यांची यादी.**

**अ. अभियोग पक्ष :–**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| १ | ५१ | फिर्याद |
| २ | ५२ | छापील प्रथम खबरी अहवाल |

**ब. बचाव पक्ष :–**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन निशाणी :–**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल :–**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**:: न्यायनिर्णय ::**
**( जाहीर दिनांक १३, ऑगस्ट २०२६ )**

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४९८–अ, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये दंडनिय अपराधासाठी खटला चालविण्यात आला आहे.

**<u>अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणेः</u>–**

२. तक्रारदार हिचे लग्न दि.२२/०४/२०२१ रोजी हिंदुशास्त्र पध्दतीने दिपक मधुकर रेपाळे रा. पारगांव, ता.श्रीगोंदा याचेबरोबर झालेले आहे. पहिले दोन महिने तक्रारदार हिला घरात चांगले नांदविले. त्यानंतर लग्नाचे दोन महिन्यानंतर घरातील काहीतरी कारण काढुन कायम तिच्याशी भांडण–तंटा करुन तिला शिवीगाळ व आपमानास्पद वागणुक देवुन तुझे माहेरच्या लोकांनी आम्हाला लग्नात व्यवस्थितीत कुठलाही मानपान दिला नाही, ज्या वस्तु सांगितल्या त्या वस्तु दिलेल्या नाहीत असे म्हणून शिवीगाळ व मारहाण करत असत. त्यानंतर काही दिवसानंतर तिचा पती, सासू व सासरे यांनी शेतीकरीता ट्रॅक्टर घ्यायचा आहे, तु तुझ्या आई–वडीलांकडून ५,००,०००/– रु घेऊन ये असे म्हणत. त्यावर तक्रारदार हिने माझ्या आई–वडीलांची परिस्थीती गरिबीची आहे, ते एवढे पैसे देवु शकत नाहीत असे म्हणाल्याने आरोपींनी तिला वाईट वाईट शिवीगाळ करुन अपमानास्पद वागणुक देऊन उपाशीपोटी ठेवत असत.

३. तक्रादार हिच्या नंदा सिमा बापु ढेंबरे, अश्विनी नितीन भापकर, कोमल निलेश बडे व तिच्या नवऱ्याची आत्याची मुलगी सविता नवनाथ खामकर हे तिला नांदण्याच्या कारणावरुन व ट्रॅक्टर घेण्याच्या कारणावरुन विनाकारण तिला त्रास देवुन शिवीगाळ व अपमानास्पद वागणुक देत असत. दि.२२/११/२०२१ रोजी तक्रारदार तिच्या माहेरी धालवडी, ता.कर्जत येथे तिच्या आई–वडीलांकडे आली होती. त्यावेळी तिने झालेला प्रकार व सासू–सासरे हे मला ट्रॅक्टर घेण्यासाठी ५,००,०००/– रुपयांची मागणी करत आहेत याबाबत सांगितले. त्यानंतर तक्रारदार ही तिच्या आई–वडील व इतर नातेवाईकंबरोबर तिच्या सासरी गेले व तिच्या सासरच्या लोकांना समजावून सांगितले की, आम्ही गरीब आहोत, आमच्याकडे येवढे पैसे नाहीत असे सांगुन ते धालवडी, ता.कर्जत येथे निघुन गेले. दरम्यानच्या काळात तक्रारदार हिला ट्रॅक्टर घेण्याच्या कारणावरुन शिवीगाळ,

मारहाण व दमदाटी करुन उपाशीपोटी ठेवुन दि.२९/०७/२०२२ रोजी घराच्या बाहेर हाकलून दिले. तक्रारदार हिला मुलबाळ होत नसल्याने तिचे सासू–सासरे तिला तु वांजुटी आहेस. तिच्या पतीने व सासू सासरे यांनी तिला स्पष्टपणे बजावले की, तु माहेरुन पैसे घेवुन ये नसता तु घटस्पोट देवुन टाक.

४. तक्रारदार माहेरी राहत असताना दि.०४/०८/२०२२ रोजी तिच्या माहेरी मौजे धालवडी येथे असताना रात्री ०९.०० वाजताचे सुमारास तिचा पती व सासू–सासरे हे तिच्या माहेरच्या घरी आले व त्यांनी तुम्ही पैसे देत नाही तर घटस्पोट देवुन टाका असे म्हणून तिला व तिच्या वडीलांना शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर तक्रारदार हिने कर्जत येथील महिला भरोसा सेल येथे अर्ज करुन आरोपींना समझोत्यासाठी वेळोवेळी बोलवले असता त्यांनी कोणत्याही प्रकारे समजोता करण्याची तयारी न दर्शविल्याने भरोसा सेल, कर्जत येथुन जा.क्र.भरोसा सेल/३४/२०२२, दि.२३/०८/२०२२ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, कर्जत यांचेकडुन आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्याचे पत्र दिल्याने तिने तक्रार दिली.

५. तक्रारदार हिने दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे, कर्जत गुन्हा क्र.५७७/२०२२ भारतीय दंड विधान कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ नुसार दाखल करण्यात आला. सदर घटनेचा तपास श्री. आर.एन.वाघ, पो.ना.२०८७, यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले व तपासाअंती आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

६. आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४९८–अ, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ नुसार नि.क्र.३७ अन्वये दोषारोप निश्चित केला, आरोपींस सदर दोषारोप वाचून दाखविला असता त्यांनी गुन्हा नाकबूल केला व

संपरीक्षेची मागणी केली. अभियोगपक्षाच्या वतीने फिर्यादीची साक्ष नोंदविल्यानंतर पुरेशी संधी देऊनही अन्य साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली नाही. त्यामुळे दि.१३/०८/२०२६ रोजीच्या नि.क्र.१ लगतच्या आदेशानुसार अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अभियोगपक्षाचे वरील साक्षीदारांच्या पुराव्यात आरोपींविरुध्द गुन्हा दर्शक पुरावा अभियोगपक्षाच्या पुराव्यात उपलब्ध नसल्याने त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन वगळण्यात आले. आरोपींचा संपुर्ण बचाव हा नकारात्मक असून त्यांना खोट्या गुन्ह्यात गोवले असा आहे.

७. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्री. डी. आर. बाविस्कर यांचा व आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. के. एस. शेवाळे यांचा युक्तीवाद ऐकला.

८. खालील मुद्दे माझ्या विचारार्थ समोर आले. त्यावरील माझे निष्कर्ष व कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे दिलेली आहे.

| अ.क्र. | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, आरोपी क्र.१ तक्रारदार नामे सुदामती दिपक रेपाळे हिचा पती असून अन्य आरोपी तिचे सासरकडील नातेवाईक असून त्यांनी दिनांक २२/०४/२०२१ रोजीचे दोन महिन्यानंतर ते दि.२९/०७/२०२२ रोजीपर्यंत तक्रारदार तिच्या सासरी पारगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर व माहेरी धालवडी, ता. कर्जत, जि. अहमदनगर येथे असताना आरोपींनी आपसात संगनमत करुन त्यांच्या सामाईक हेतूच्या पुर्ततेकरीता तक्रारदार हिच्याकडे ट्रॅक्टर घेण्यासाठी माहेरहून पैसे आण अशी मागणी करुन सदर मागणी पुर्ण करण्यास तक्रारदार हिने नकार दिल्यानंतर आरोपींनी सदर बेकायदेशीर | .. नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | मागणीच्या पुर्ततेकरीता आरोपींनी तक्रारदार हिला मारहाण करुन व सर्व आरोपींनी तिचा जाणिवपूर्वक अपमान करुन तिचा शारीरिक व मानसिक आरोग्यास अपाय होईल असे कृत्य केले आणि तिचा शारिरीक व मानसिक छळ केला व त्याअन्वये आरोपींनी भा. दं. वि. चे कलम ४९८–अ सह कलम ३४ अन्वयेचा गुन्हा केला? | |
| २. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमूद केलेल्या दिनांक, वेळ आणि ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन त्यांच्या सामाईक हेतुचे पुर्ततेकरीता आरोपींनी तक्रारदार हिस मारहाण करून तिला इच्छापुर्वक शारीरिक दुखापती केल्या व त्यायोगे भा.दं.वि. कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला? | .. नकारार्थी. |
| ३. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमूद केलेल्या दिनांक, वेळ आणि ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन त्यांच्या सामाईक हेतुचे पुर्ततेकरीता तक्रारदार व तिच्या वडीलांना शिवीगाळ करुन अपमानित केले जेणेकरुन त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल अथवा अपराध घडेल असे जाणीवपूर्वक कृत्य करुन आरोपींनी भा.दं.वि. कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला? | .. नकारार्थी. |
| ४. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमूद केलेल्या दिनांक, वेळ आणि ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन त्यांच्या सामाईक हेतुचे पुर्ततेकरीता तक्रादार, तिचे आई–वडील व भाऊ यांना दमदाटी करुन फौजदारी पात्र धाकदपाटशा दाखविला व भा.दं.वि. कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | .. नकारार्थी. |
| ५. | अंतिम आदेश काय ? | .. आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## का र ण मि मां सा

<u>मुद्दा क्रमांक १ ते ५ करीता</u> :–

९. प्रस्तुत खटल्यात आरोपींविरुध्दचा दोषारोप शाबीत होण्यासाठी दिनांक २२/०४/२०२१ रोजीचे दोन महिन्यानंतर ते दि.२९/०७/२०२२ रोजीपर्यंत तक्रारदार तिच्या सासरी पारगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर व माहेरी धालवडी, ता. कर्जत, जि. अहमदनगर येथे आरोपींनी त्यांच्या सामाईक हेतूचे पुर्ततेसाठी एकमेकांशी संगनमत करुन तक्रारदार हिस शारीरिक व मानसिक स्वास्थास धोका होईल या हेतूने जाणीवपूर्वक तिचा शारिरीक व मानसिक छळ केला. तसेच तिला आरोपींनी मारहाण करुन शारीरिक ईजा केली आणि सर्व आरोपींनी तिला अपमानित करून सार्वजनिक शांततेचा भंग होईल अशा प्रकारचे कृत्य तिच्याकडून होईल या हेतूने तिला जाणिवपूर्वक चिथावणी दिली व जिवे मारण्याची धमकी देऊन फौजदारी धाकदपटशा दाखविला याबाबी संशयातीतरितीने शाबीत करण्याची जबाबदारी अभियोग पक्षाची आहे.

१०. प्रस्तुतच्या खटल्यातील तक्रारदार ही आरोपी क्र.१ ची पत्नी असून अन्य आरोपी तिचे सासरकडील नातेवाईक असल्याचे विवादीत नाही. अभियोगपक्षाच्या वतीने तपासण्यात आलेला साक्षीदार क्र.१ तक्रारदार सुदामती दिपक रेपाळे (नि.क्र.५०) हिने तिच्या सरतपासात तक्रारीतील मजकुराशी सुसंगत कथन केलेले नाही. तिच्या कथनानुसार ती आरोपींना ओळखते, कारण आरोपी क्र. १ तिचा पती असून अन्य आरोपी तिचे सासरकडील नातेवाईक आहेत. ती तिच्या सासरी नांदत असताना आरोपी व तिच्यात किरकोळ कारणावरुन वाद झाले होते. त्यानंतर तिने रागाच्या भरात आरोपींविरुध्द दि.२३/०८/२०२२ रोजी पोलीस ठाणे येथे तक्रार दिली होती. आरोपींनी तिच्याकडे पैशाची मागणी करुन सदर मागणीच्या पुर्ततेकरीता तिचा शारिरीक व मानसिक छळ केला असे तिने तक्रारीत नमुद केल्याचे तिला आठवत नाही. आरोपींनी तिच्याकडे शेतीसाठी

टँकर खरेदी करण्यासाठी माहेरहून पाच लाख रुपये आण अशी मागणी केली व सदर मागणीच्या पुर्ततेकरीता तिचा शारिरीक व मानसिक छळ केला असे काही घडले नव्हते.

११.　　तक्रारदार ही घडलेल्या हकीकतीप्रमाणे जबाब देत नव्हती म्हणून विद्वान सरकारी वकिलांनी तिला उलटतपासात विचारण्यात येणारे प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. तशी परवानगी देण्यात आली. तरी सुध्दा तक्रारदार हिने तिच्या जबाबामधील नमुद मजकुर नाकारला.

१२.　　अभिलेखाचे अवलोकन केले व उभय पक्षांच्या वतीने करण्यात आलेला युक्तीवाद विचारात घेतला. आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपाच्या अनुषंगाने भा.दं.वि. कलम ४९८–अ या कलमात अंतर्भूत क्रुरता या संज्ञेचा अर्थ बघणे गरजेचे आहे. *या कलमाच्या उद्देशाने, "क्रूरता" म्हणजे–*

*(अ) स्त्रीला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करेल किंवा गंभीर दुखापत होईल किंवा स्त्रीचे जीवन, अंग किंवा आरोग्य (मग मानसिक किंवा शारीरिक) धोक्यात येईल अशा स्वरूपाचे कोणतेही हेतुपुरस्सर वर्तन; किंवा*

*(ब) महिलेचा छळ जेथे तिला किंवा तिच्याशी संबंधित कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही मालमत्तेची किंवा मौल्यवान सुरक्षिततेची कोणतीही बेकायदेशीर मागणी पूर्ण करण्यासाठी किंवा तिच्या किंवा तिच्याशी संबंधित कोणत्याही व्यक्तीने अशी मागणी पूर्ण करण्यात अयशस्वी झाल्यामुळे असा छळ केला जातो.*

१३.　　प्रस्तुत खटल्यातील फिर्यादी हिने तिच्या कथनावरुन दिसून येते की, तिने आरोपींविरुध्द तक्रार दिली होती. तथापि, तिच्या कथनानुसार सदरची

केवळ तिच्यात व आरोपी दरम्यान किरकोळ कारणावरुन बाचाबाची झाल्याने दिलेली होती. आरोपी क्र.१ हा तक्रारदार हिचा पती व अन्य आरोपी तिचे सासरकडील नातेवाईक आहेत. सदर साक्षीदाराने आरोपीने तिच्या आरोग्यास अपाय होईल अथवा तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करेल अशा प्रकारचे कृत्य केल्याचे कथन केलेले नाही. तसेच आरोपींनी तिच्याकडे बेकायदेशीर मागणी करून सदर मागणीच्या पुर्ततेकरीता तिला मारहाण तसेच शिवीगाळ व दमदाटी केली असे देखील कथन केलेले नाही. तिने दिलेली तक्रार व सदर तक्रारीवरून दाखल प्रथम खबरी अहवाल यावरील केवळ तिची सही कबूल केलेली आहे. तिने अभियोगपक्षाच्या कथनाशी सुसंगत कथन केलेले नाही. अशा परिस्थितीत अभियोगपक्षाच्या वतीने अन्य साक्षीदारांची साक्ष नोंदविली असती तरी आरोपींविरुध्दचा दोषारोप संशयातीत रितीने शाबीत होण्याइतपत पुरावा वादपटलावर आला असता असे वाटत नाही. प्रस्तुत खटल्यातील फिर्यादीने आरोपी व तिच्यात न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे कबूल केलेले आहे. तथापि, तिने सदर तडजोडीमुळे तिने न्यायालयात खोटी साक्ष दिल्याचे नाकारलेले आहे. आरोपी व तक्रारदार यांच्यातील कौटूंबिक वाद तडजोडीने मिटले आहेत. त्यामुळे तक्रारदार हिने न्यायालयात घटनेबाबत नकारात्मक कथन केल्याची शक्यता दिसून येते. सदर फिर्यादीने केवळ तडजोडीमूळे सदर कथन केल्याचे शक्यता दिसत असली तरी त्यावरुन तिने न्यायालयात खोटी साक्ष दिली असा अनुमान काढणे उचित ठरणार नाही.

१४. वरील विवेचनावरुन भा.दं.वि. कलम ४९८–अ मध्ये अंतर्भूत छळवणूक या संज्ञेत प्रत्यक्ष कौटुंबिक कलहाचा समावेश नाही. आरोपींच्या छळामुळे तक्रारदार हिला आत्महत्येबाबत विचार करण्यास प्रवृत्त करेल किंवा तिच्या शारीरिक स्वास्थास अपाय झाला असे वादपटलावरील पुराव्यावरुन स्पष्ट दिसुन येत नाही. वादपटलावरील पुरावा तक्रारदार व आरोपी यांच्यात कौटुंबिक

कलह असल्याचे दर्शवित असला तरी आरोपींनी भा.दं.वि.कलम ४९८–अ मध्ये अंतर्भूत कारणांसाठी तक्रारदार हिचा शारीरिक व मानसिक छळ केल्याचे शाबीत होण्यासाठी पुरेसा नाही.

१५. वरील विवेचनानुसार अभियोगपक्षाच्या वादपटलावरील पुरावा संशयातीत नाही हे दिसून येते. आरोपींनी तक्रारदार हिचा मानसिक व शारीरिक छळ करुन भा.दं.वि. कलम ४९८–अ मध्ये अंतर्भूत छळवणूकीचे कृत्य केल्याचे सबळ पुराव्यानिशी शाबीत झालेले नाही.

१६. तसेच, अभियोगपक्ष आरोपींनी त्यांच्या सामाईक हेतूच्या पुर्ततेकरीता तक्रारदार हिस हाताचापटाने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत केली तसेच सर्व आरोपींनी तिचा अपमान करुन तिला चिथावणी दिली व फौजदारी पात्र धाकदपटशा दाखविला याबाबत देखील वादपटलावर कोणताही पुरावा आलेला नाही. सबब, अभियोगपक्ष आरोपींविरुध्दचा दोषारोप सबळ पुराव्यानिशी शाबीत करु शकलेला नाही असे मत मी नोंदवित आहे. सबब, मुद्दा क्र.१ ते ४ चा निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवित आहे.

१७. मुद्दा क्र.१ ते ४ च्या निष्कर्षावरुन अभियोगपक्ष आरोपींविरुध्दचा दोषारोप संशयातीत रितीने शाबीत करु शकला नाही हे स्पष्ट झालेले आहे. अशा परिस्थितीत सदर आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, मुद्दा क्रमांक ५ करीता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी क्र.१ दिपक मधुकर रेपाळे, आरोपी क्र.२ लताबाई मधुकर रेपाळे, आरोपी क्र.३ मधुकर निवृत्ती रेपाळे, आरोपी क्र.४ सिमा बापु ढेंबरे,

आरोपी क्र.५ अश्विनी नितीन भापकर, आरोपी क्र.६ कोमल निलेश बडे व आरोपी क्र.७ सविता नवनाथ खामकर यांना भारतीय दंड विधान कलम ४९८–अ, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याच्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपी क्र.१ ते ७ यांचे जामिन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपी क्र.१ ते ७ यांना असे निर्देशीत करण्यात येते की, त्यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७ (अ) च्या पुर्ततेकामी न्यायालयात ६ महिन्याच्या कालावधीकरीता प्रत्येकी रक्कम रुपये १५०००/– चे वैयक्तिक बंधपत्र व जामिनदार द्यावेत.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

SHIVAJI N THAPEKAR

Digitally signed by SHIVAJI N THAPEKAR
Date: 2026.08.14 18:43:04 +0530

दिनांक : १३.०८.२०२६.
ठिकाण : कर्जत.

**(एस. एन. थापेकर)**
न्यायदंडाधिकारी प्रथम
वर्ग, न्यायालय क्र.१, कर्जत

## <u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणीत करण्यात येते की, या पी.डी.एफ. फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ न्यायनिर्णयाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | : | **श्री.एस. एन. थापेकर**<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,<br>न्यायालय क्र.१, कर्जत, जि.अहमदनगर. |
| लघुलेखकाचे नाव | : | **वैभव गो. घोगरे**<br>लघुलेखक (श्रेणी.३). |
| न्यायनिर्णय दिनांक | : | १३/०८/२०२६ |